03-03-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 03/03/2025 12:05 AM Page 1



# सांस्कृतिक वारसा पुढे नेण्यासाठी महोत्सव उत्तम व्यासपीठ

## मंत्री गोविंद गावडे डिचोलीत 'भत ग्राम महोत्सवा'चे उद्घाटन

टीम दैनिक हेराल्ड



डिचोली : भतग्राम महोत्सवाचे उदघाटन करताना मंत्री गोविंद गावडे. बाजूला नरेश सावळ, विजय कुमार नाटेकर व मान्यवर.

**डिचोली, दि. २** : जीवनात यशस्वी होण्यासाठी दिवसा स्वप्ने बघा त्यांचा पाठलाग करा. तात्पुरता विचार न करता ध्येय निश्चित करण्यासाठी एका क्षेत्रात फोकस करून मास्टरकी मिळवा तर निश्चित यश मिळेल. माणूस घडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे. युवकांना योग्य दिशा दाखवण्यासाठी भत ग्राम महोत्सव सारखे उत्सव सातत्याने होणे गरजेचे आहे. प्रतिभेला चालना मिळते, असे प्रतिपादन मंत्री गोविंद गावडे यांनी डिचोलीत केले.

डिचोली बचाव अभियान आयोजित 'भतग्राम महोत्सवा'च्या उदघाट्न प्रसंगी बोलताना केले.

छत्रपती शिराजी महाराज मैदानावर आयोजित दोन दिवशीय महोत्सवाचे उद्घाटन गावडे व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सुरवातीला मान्यवर तसेच दिंडी पथकासह दिंडी फेरी काढण्यात आली. व्यासपीठवार नरेश सावळ, नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, दीपा पळ, कुंदन फळारी, नरेश कडकडे, डॉ. रामा गावकर, किरण गोवेकर, सुशांत पेडणेकर, सुदन गोवेकर, नीलेश टोपले, रंजना वायंगणकर, रियाज बेग, सुखदा तेली, मिलिंद तेली, सावित्री घाडी, सरपंच पंचायत सदस्य आदी उपस्थित होते.

महोत्सवाचे अध्यक्ष नरेश सावळ यांनी स्वागत पर भाषणात पाच वर्षाच्या नंतर तेरावा भत ग्राम महोत्सव होत आहे. डिचोली कलेची भूमी कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करताना सर्व पक्षीय लोकांचा सहभाग मिळाला आहे. नितळ डिचोली हा आमचा संकल्प आहे. सर्व क्षेत्रातील कला क्रीडा क्षेत्रात उत्तेजन देणे हा आमचा हेतू आहे. हा उत्सव सर्वांचा आहे तो गोव्याच्या सर्व भागात नेण्याचा संकल्प आहे, असे नरेश सावळ यांनी केले.

नगराध्यक्ष विजय कुमार नाटेकर यांनी प्लास्टिक मुक्त शहर करण्यासाठी सहकार्य करा. डिचोली कलेची भूमी असून या ठिकाणी कलेचा गौरव होत आहेतिथे कसलेच राजकारण नाही, असे ते म्हणाले.

गौरव सोहळा व सत्कार सोहळा

या वेळी विविध क्षेत्रात योगाने दिलेले क्रीडा कला आदी विभागातील खेळाडू तसेच विविध मान्यवरांचा गावडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रात योगदान दिलेल्या

अरुणा पाटणेकर, श्रीकृष्ण नाईक, प्रशांत चणेकर, रामनाथ देसाई, स्नेहा खोत, अनिल लावणीस, वॉल्टर डिसोझा, अनुजा मणेरीकर आदींचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन चैती कडकडे, निशांत चणेकर तर डॉ. रामा गावकर यांनी आभार मानले.

पान १ वरून

### नुवेमध्ये राष्ट्रीय महामार्ग ६६च्या विस्ताराला स्थानिकांचा विरोध

रहिवाशांनी आणखी एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे लक्ष वेधले आहे. त्यांच्या मते, कार्मेल कॉलेजच्या पलीकडे रस्ता विस्तार करण्याचा कोणताही प्रस्ताव नाही. त्यामुळे नुवे चर्च जंक्शनवर वाहतूक कोंडी वाढण्याची शक्यता आहे. आमदारांच्या अलीकडील विधानांमुळे स्थानिक नागरिक अधिकच अस्वस्थ झाले असून, त्यांनी आपल्या विरोधाला आणखी बळ दिले आहे. प्रस्तावित महामार्ग विस्ताराला कोणताही व्यावहारिक फायदा नाही, असा त्यांचा ठाम दावा आहे. त्यामुळे हा निर्णय फेरविचारासाठी शासनाने पुनरावलोकन करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# मडगावात कार्निव्हल मिरवणूक उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २** : मडगाव नगरपालिकेने पर्यटन खात्याच्या सहकार्याने आयोजित केलेली कार्निव्हल मिरवणूक मोठ्या उत्साहात पार पडली. या मिरवणुकीत पारंपरिक चित्ररथांबरोबर सामाजिक संदेश देणारे, गोव्याची कृषी परंपरा, आद्य कलाकृती, व्यवसाय यांची माहिती देणारे चित्ररथ सहभागी झाले होते. त्याचबरोबर लोकनृत्य करणारी पथके ही सहभागी झाली होती.मडगावातील होली स्पिरीट चर्चजवळून ही मिरवणूक सुरू झाली. पर्यटनमंत्री रोहन खवंटे यांच्याहस्ते हिरवा बावटा दाखवून ही मिरवणूक सुरू करण्यात आली. यावेळी मडगावचे आमदार दिगंबर कामत, नावेलीचे आमदार उल्हास तुयेकर, फातोर्डाचे माजी आमदार तथा भाजप गोवा प्रदेशाध्यक्ष दामू नाईक, नगराध्यक्ष दामोदर शिरोडकर, उपनगराध्यक्ष बबिता सदानंद नाईक, आयोजन समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक कामिल बार्रेटो, नगरसेवक राजू नाईक, नगरसेवक सदानंद नाईक, नगरसेवक महेश आमोणकर, नगरसेवक मिलाग्रीना तसेच इतर नगरसेवक, नगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते. 'खावो, पिवो, मजा करण्या'बरोबरच गोव्याची एकजुट अबाधीत राखण्याचे आवाहन यावेळी पर्यटनमंत्री रोहन खवंटे, भाजप गोवा प्रदेशाध्यक्ष दामू नाईक, आमदार दिगंबर कामत, आमदार उल्हास तुयेकर यांनी यावेळी दिली. होली स्पिरीट चर्चजवळून ही मिरवणूक पारंपरिक मार्गाने हॉस्पीसीयो इस्पीतळाकडून मडगाव नगरपालिका चौकात आली. मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा लोक जमले होते. मिरवणुकीत लोकनृत्याच्या विविध प्रकारांचे सादरीकरण सुरू होते. त्याचबरोबर चित्ररथ ही सहभागी झाले होते. त्यात किंग मोमोच्या चित्ररथासहीत पारंपरिक चित्ररथ, गोव्याची कृषी परंपरा, व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, आदिम जीवनशैली दर्शवणारे चित्ररथ सहभागी झाले होते. त्याचबरोबर समाज प्रबोधन करणारे चित्ररथ ही सहभागी झाले होते. काही व्यावसायिक चित्ररथ ही सहभागी झाले होते. मोठ्या उत्साहात चित्ररथ मिरवणूक पार पडली. मिरवणूक मार्गासहीत नगरपालिका चौकात उभारण्यात आलेल्या व्यासपीठाजवळ ही मिरवणूक पाहण्यासाठी लोक जमले होते. रविवार असल्याने चांगला प्रतिसाद या मिरवणुकीला मिळाला.



मोरजी : बाजार डे च्या उद्घाटन प्रसंगी कृषी अधिकारी राजू जोशी, कृषी अधिकारी उमा जोशी व इतर.

# आपल्या धर्माचा अभिमान बाळगा : पद्मश्री निवेदिता भिडे

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २** : प्रत्येकात एकात्मतेची दृष्टी हवी हे जगाला योगदान आपण देऊ शकतो. भारत सांस्कृतिक राष्ट्र आहे. आपले कार्य ही पूजा आहे. जाणिवेच्या स्तरावर जाऊन काम करायला हवे. भारताच्या पुनरुत्थानतरूण करू शकतील. विविधतेचा आदर करून विविधतेला जोडणारे तत्व समजले पाहिजे. आपल्या धर्माचा अभिमान बाळगा पण दुसऱ्या धर्माचा आदर ठेवा, असे स्वामी विवेकानंद यांचे संदेश आपल्याला आजच्या जटिल समस्यांचे निराकरण करतील, असे प्रतिपादन विवेकानंद केंद्र



कन्याकुमारी च्या उपाध्यक्ष जीवनव्रती निवेदिता भिडे यांनी येथे केले. डी. डी. कोसंबी विचार महोत्सवात द रिलेवन्स ऑफ द मॅसेज ऑफ स्वामी विवेकानंद या विषयावर पद्मश्री निवेदिता भिडे यांनी गुरुवारी चौथे पुष्प गुंफले.

यावेळी त्यांनी, विवेकानंद यांच्या प्राध्यापकाने 'तो खुप मोठा होशील' हे केलेले भाकित, शिकागो येथील सर्व धर्म परिषदेत जाताना त्यांची असलेली परिस्थिती, तिथे आलेल्या समस्या, झालेली हेटाळणी, त्यानंतर त्यांचे विचार ऐकून त्यांची झालेली प्रशंसा, त्यांचे लावलेले गेलेले मोठ मोठे पोस्टर्स याबदल सांगून विवेकानंदांचे विचार किती उदात्त होते याची प्रचिती आणून दिली. विवेकानंदांनी त्यानंतर तीन दिवस तीन रात्री कन्याकुमारी येथे शिळेवर बसून ध्यान करून मी समाजासाठी काय करू शकतो ? हा प्रश्न स्वतःला विचारला व त्याविषयी चिंतन केले, हा प्रसंग सांगून निवेदिता भिडे म्हणाल्या, इतर कसे वागतात यावर आपला आनंद अवलंबून असण्याचे कारण नाही. आपली शांती, आपला आनंद आपल्यातच असतो याची जाणीव विवेकानंदांनी करून दिली. वेदांत, तत्वज्ञान योगाच्या माध्यमातून त्यांनी जगाला शिकवले. व्याख्यानंतर श्रोत्यांच्या काही प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देवून निराकरण केले. त्यांनी सांगितले, जीवनातील समस्या झेलण्यासाठी चांगल्या ग्रंथांचे वाचन, चिंतन करायला हवे. फळाची अपेक्षा बाळगून कुठलेही काम करता नये. प्रा. संगीता अभ्यंकर आजच्या व्याख्यानाच्या मॉडरेटर होत्या. सिद्धी उपाध्ये यांनी सूत्रसंचालन केले. कला संस्कृती संचालनालयाचे संचालक सगुण वेळीप यांच्या हस्ते निवेदिता भिडे यांचा सन्मान करण्यात आला.

# मोरजी सरकारी विद्यालयाचा 'बाजार डे' उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि.२** : सरकारी प्राथमिक विद्यालय देऊळवाडा मोरजी पेडणे या विद्यालयातर्फे श्री मोरजाई देवीच्या परिसरात बाजार दिन आयोजन करण्यात आले होते. कृषी खात्याचे अधिकारी रघुनाथ जोशी व उमा जोशी यांनी या बाजार दिनाचे उद्घाटन केले. त्या कार्यक्रमाला शाळेच्या अध्यक्षा दीपिका शेटगावकर, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा-सुनयना शेट्ये, माजी अध्यक्ष भिकाजी गोवेकर, शाळेचे मुख्याध्यापक, सोमनाथ शेटमांद्रेकर, पूर्व प्राथमिक विभाग शिक्षिका रजनी शेटगावकर तसेच पालक, ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. बाजार दिनाच्या माध्यमातून मुलांना व्यावहारिक ज्ञान मिळते आणि हे ज्ञान आपल्या जीवनात ते सदैव वापरू शकता, विविध प्रकारच्या वस्तूंची ओळख होते.

कशाप्रकारे गिऱ्हाईकाला आपली वस्तू चांगली आहे, हे पटवून दिले पाहिजे. कशाप्रकारे हिशोब केले पाहिजे, असे विचार रघुनाथ जोशी यांनी व्यक्त केले. आम्ही सर्वांनी सरकारी नोकरीचीच अपेक्षा न करता विविध व्यवसाय करून स्वावलंबी होऊ शकतो. यासाठी पालकांनी मुलांना प्रोत्साहन दिले पाहिजे असे विचार भिकाजी गोवेकर यांनी व्यक्त केले. शाळेतील एकूण २४ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात भाग घेतला होता, अनेक प्रकारच्या गावठी भाज्या, नारळ, तेल, तांदूळ, फळे, घरगुती पदार्थ, लाडू, चिवडा, शेव इ. वस्तूंची विक्री मुलांनी केली.

# शिरोडा येथे ३ रोजी शेवंता जीती हाय

टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २** : महाशिवरात्रीनिमित्त बोरी शिरोडा येथील श्री देवी कामाक्षी संस्थान मंदिरात सोमवार ३ रोजी संध्या ८.३० वाजता 'शेवंता जीती हाय' नाटक होणार आहे.

सदर नाटक हरमल येथील कामाक्षी नाट्यवृंदतर्फे सादर होणार असून, महेश पै दिग्दर्शित या नाटकात काशिनाथ पै, नंदू पै, शौनक पै, दिलीप म्हामल, दीपक हळदणकर व सुहासिनी नाईक यांच्या भूमिका आहेत. तरी नाट्य रसिकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन कामाक्षी नाट्यवृंदने केले आहे.

# डुप्लिकेट इपीआयसी (एपिक) क्रमांकांबाबत निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

**नवी दिल्ली, दि. २ :**

भारतीय निवडणूक आयोगाने काही राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकसारख्या अल्फान्यूमेरिक मालिकेचा वापर झाल्याने मतदार ओळखपत्र इपीआयसी क्रमांकांच्या डुप्लिकेशनच्या बाबतीत स्पष्टता दिली आहे.

निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, काही मतदारांचे इपीआयसीक्रमांक एकसारखे असू शकतात, मात्र त्या मतदारांचे लोकसंख्याशास्त्रीय तपशील, विधानसभा मतदारसंघ आणि मतदान केंद्र वेगळे असतात. त्यामुळे कोणताही मतदार फक्त आपल्या राज्यातील किंवा केंद्रशासित प्रदेशातील संबंधित मतदारसंघातच मतदान करू शकतो.

एरोनेट प्लॅटफॉर्मच्या अंमलबजावणीपूर्वी, विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेश स्वतंत्रपणे मतदार याद्या व्यवस्थापित करीत होते. त्यामुळे काही राज्यांनी समान अल्फान्यूमेरिक मालिका वापरल्याने डुप्लिकेट एपिक क्रमांकांची काही प्रकरणे समोर आली. निवडणूक आयोगाने यासंदर्भात पुढाकार घेत अद्वितीय एपिक क्रमांक सुनिश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या मतदारांना डुप्लिकेट क्रमांक वाटप झाले आहेत, त्यांना नव्या अद्वितीय एपिक क्रमांकासह सुधारित ओळखपत्र दिले जाईल. यासाठी एरोनेट २.० प्लॅटफॉर्म अद्ययावत केला जात आहे. भारतीय निवडणूक आयोगाने मतदारांना या प्रक्रियेबाबत सहकार्य करण्याचे आवाहन केले असून, कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.




विर्नोडा : बक्षीस देताना मुख्याध्यापक नागेश गोसावी व इतर.

# विर्नोडा सरकारी विद्यालयाचे बक्षीस वितरण, स्नेहसंमेलन

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २** : सरकारी प्रार्थमिक विद्यालय व पूर्व प्राथमिक विभाग भूतवाडी विर्नोडा यांचे वार्षिकबक्षीस वितरण सोहळा व स्नेहसम्मेलन नुकतेच मोठया उत्साहात झाले.

या स्नेहसंमेलनाला पाहुणे म्हणून विकास हायस्कूल विर्नोडा यांचे मुख्याध्यापक नागेश गोसावी लाभले होते. तर म्हापसा येथील सक्रिय कार्यकर्ते प्रणव बाणावलकर व शाळेच्या निवृत्त शिक्षिका विद्या नाईक हे विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते. त्यांच्या सोबत मुळवीर देवस्थानचे अध्यक्ष प्रकाश राव, पालक शिक्षक संघांचे अध्यक्ष प्रशांत राव, उपाध्यक्ष संदीप राव व शाळेच्या शिक्षिका त्रिवेणेश्वरी नार्वेकर शिक्षिका होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाली. याप्रसंगी माता पालकांनी स्वागत गीत सादर केले. पाहुण्यांचा हस्ते वार्षिक बक्षिसे देण्यात आली. प्राप्ती प्रशांत राव हिला २०२४-२५ चा सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी हा पुरस्कार प्राप्त झाला.

त्यानंतर पूर्व प्रार्थमिक व प्रार्थमिक विद्यार्थ्यांनी बहारदार संस्कृतिक कार्यक्रम सादर केला. नाटकें, एकपात्री नाटकें, सांघिक व वैयक्तिक नृत्ये यांचा समावेश होता. लोकमता अहिल्याबाई होळकर यांना मानवंदना देणारे एक नाटक सुद्धा याप्रसंगी सादर झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ शीतल मालपेकर या शिक्षिकेने केले. अहवाल वाचन त्रिवेणीश्वरी नार्वेकर यांनी केले. तर आभार पूजा राव यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**Indian Overseas Bank**
**इण्डियन ओवरसीज़ बैंक**
Good people to grow with
www.iob.in

**वास्को द गामा शाखा (०९१४)**
**परेरा चेंबर्स, वास्को द गामा, गोवा ४०३८०२**
**ईमेल : iob0194@iob.in**

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलावाकरिता जाहीर सूचना**

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट,** 2002 (2002 **चा क्र. 54 वा) खाली बँकेकडे गहाण टाकलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री**

ज्याअर्थी, **इंडियन ओव्हरसीज बँकेच्या** प्राधिकृत अधिकाऱ्याने खालील कर्ज खात्यांमधील सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 13(2) खाली पाठवलेल्या मागणी सूचनांच्या अनुषंगाने खालील मालमत्तांचा ताबा त्या आमच्या पूर्ण देय रकमेची होईपर्यंत त्यावरील व्याज व किमतींसह बँकेच्या दि. **27.02.2025** रोजी देय असलेल्या रु. **179224472.67/-** या रकमेची वसुली करण्याकरिता **'जसे आहे जेथे आहे', 'जे आहे जे काही आहे,' व 'तेथे जे जे काही आहे'** या तत्वावर विकण्याच्या हक्कासह घेतला आहे आणि ज्याअर्थी, सदर देय रकमेची परतफेड करण्यात कर्जदारास अपयश आल्याने सदर कायद्याच्या कलम 13(4) खाली त्यास प्रदान झालेल्या अधिकारांसह सदर मालमत्तांच्या विक्रीद्वारे बँकेला देय रकमेची वसूली करण्याचा प्रस्ताव आहे. खाली सही करणाऱ्याद्वारे **https://baanknet.com/** या वेबपोर्टलवर पुरविलेल्या ई-ऑक्शन प्लॅटफार्मद्वारे सदर विक्री केली जाईल.

**कर्जदार/गहाणवटदाराचे नाव व पत्ता:** 1. **भास्कर चंद्रकांत निखार्गे, प्रोप्रा. मे. सुकामल ट्रेडर्स,** पत्ताः फ्लॅट क्र. युजी-3, मेरीलेन रिवेरा, वाडे बीच, राष्ट्रोली मंदिरानजीक, वास्को द गामा, गोवा-40802, दूर.क्र. 9823199678, कायम पत्ताः फ्लॅट क्र. युजी-3, मेरीलेन रिवेरा, वाडे बीच, राष्ट्रोली मंदिरानजीक, वास्को द गामा, गोवा-40802, दूर.क्र. 9823199678.

**हमीदार/गहाणवटदाराचे नाव व पत्ता:** 1. नावः **श्री. विपीन दत्ताराम शेट्ये,** पत्ताः सुकूर चर्चाजवळ, जोशी वाडा, सुकूर पर्वरी, उत्र गोवा, बार्देश, गोवा-403501 दूर.क्र. 9822691584, 2. कु. शीतल भास्कर निखार्गे, पत्ताः फ्लॅट क्र. युजी-3, मेरीलेन रिवेरा, वाडे बीच, राष्ट्रोली मंदिरानजीक, वास्को द गामा, गोवा-40802, दूर.क्र. 9225903528.

**एनपीए तारीख : 28.10.2023, मागणी सूचना तारीखः 16.11.2023, मागणी सुचनेतील दावा केलेली देय रक्कमः** दि. **16.11.2023** रोजी रु. **1,51,36,866.57** अधिक त्यापुढील व्याज व किमती. **ताबा घेतल्याची तारीखः 27.02.2024, कब्जा सुचनेतील दावा केलेली देय रक्कमः** दि. **27.02.2025** रोजी रु. **1,79,24,472.67/-** अधिक त्यापुढील व्याज व किमती.

*स्थानिक स्व शासन (मालमत्ता कर, पाणी सांडपाणी, वीज देयके इ.) : माहित नाहीत.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

मालमत्ता-1 - 86.5 चौ.मी.क्षेत्रफळाची मागूर हिल, वास्को द गामा, गोवा येथील कामत पॅलेस बिल्डींगच्या तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. 13 या मालमत्तेचा संपूर्ण भाग. **चतु:सीमाः पूर्वेसः** सियानो परेरा यांच्या वारसांची मालमत्ता, **पश्चिमेसः** नगरपालिका रस्ता, **उत्तरेसः** एस एस लोटलीकर व इतरांची मालमत्ता, दक्षिणेसः पीटी शीट क्र. 121 चा चलता क्र. 20 (भाग). मालमत्ता भास्कर चंद्रकांत निखार्गे यांचे नावे आहे. मालमत्ता-2- 23.13 चौ.मी.क्षेत्रफळाची स्वतंत्रता पथ, वास्को द गामा येथील क्विनी इलाईट बिल्डींगच्या तळमजल्यावरील कमर्शियल गाळा क्र. 14 या मालमत्तेचा संपूर्ण भाग. **चतु:सीमाः पूर्वेसः** सरकारी शाळा, **पश्चिमेसः** राजाराम बांदेकराच्या कायदेशीर वारसांची मालमत्ता, **उत्तरेसः** स्वतंत्रता पथ, **दक्षिणेसः** इंडियन रेल्वेची मालमत्ता. ही मालमत्ता भास्कर चंद्रकांत निखार्गे यांचे नावे आहे.

राखीव किंमत व बयाणा रक्कम ठेव खालीलप्रमाणे आहे :

| सुरक्षा तपशील | राखीव किंमत | | |
|---|---|---|---|
| मालमत्ता-1 | रु. 43,44,000 | रु. 4,34,000 | रु. 50,000/- |
| मालमत्ता-2 | रु. 46,82,000 | रु. 4,68,200 | रु. 50,000/- |

**लिलावाची तारीख व वेळ : 21.03.2025, सकाळी 10.00 ते संध्या. 4.00, बोली वाढ मूल्यः रु. 50,000/-.** स्वयंचलित विस्तार वेळः **10** मिनिटे. ज्ञात भार, काही असल्यासः काही नाहीत. पाहणीची तारीखः **02.03.2025** ते **20.03.2025** सकाळी **10.00** ते संध्या. **4.00** या कार्यालयीन वेळेत.

बोलीदारांनी ग्लोबल ईएमडी वालेट खात्यात **21.03.2025** रोजी संध्या. **4.00** पूर्वी **ऑनलाईन प्रणालीने ईएमडी भरणा** जमा करावा.

* सांविधिक देय रकमांपेक्षा बँकेच्या देय रकमेस जास्त महत्व आहे. अटी व शर्तींसाठी कृपया भेट द्या : **https://baanknet.com/**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**इंडियन ओव्हरसीज बँक**

**दिनांक : 01.03.2025**
**ठिकाण: वास्को द गामा**

# कायद्याची माहिती असणे मूलभूत गरज

## ॲड. आत्माराम बर्वे : धनंजय जोग यांच्या 'ग्राहक हक्क जागृती' पुस्तकाचे प्रकाशन

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २** : कायद्याविषयी माहिती असणे ही प्रत्येकाची मूलभूत गरज आहे, म्हणून कायद्याची माहिती घासून पुसून लख्ख करावी लागेल. धनंजय जोग यांनी ग्राहक कायद्याविषयी जागृती करणारा आपल्या पुस्तकात कथा रूपात जुगाड लावलाय व त्यात ते यशस्वी ठरले आहेत. क्लिष्ट विषय सहज सोपा करून तळमळीने त्यांनी मांडला आहे, असे प्रतिपादन राज्य माहिती आयुक्त ॲड. आत्माराम बर्वे यांनी येथे केले.

ग्राहक आयोगाचे माजी अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती धनंजय जोग यांच्या 'ग्राहक हक्क जागृती' या राज भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या पुस्तकाचे शुक्रवारी येथील आयएमबी परिषद गृहात, इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा, (आयएमबी)च्या सहयोगाने आयोजित प्रकाशन सोहळ्यात आयएमबीचे अध्यक्ष दशरथ परब यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आत्माराम बर्वे बोलत होते.

व्यासपीठावर भाषा संचालनालयाचे संचालक प्रशांत शिरोडकर, उपसंचालक अनिल सावंत व धनंजय जोग उपस्थित होते.



पणजी : आयएमबी पणजी येथे ग्राहक हक्क जागृती पुस्तकाचे प्रकाशन करतांना दशरथ परब व आत्माराम बर्वे सोबत अनिल सामंत, धनंजय जोग व प्रशांत शिरोडकर.

ग्राहक आयुक्त असताना जोग यांनी दिलेले निवाडे, त्यांचे ग्राहक हक्क कायद्याविषयीचे ज्ञान, अनुभव, ग्राहकांना सतर्क करण्यासाठी उपयुक्त ठरतील. त्यांची तठस्थता, त्रयस्थता लेखनात जाणवते. डिजिटल युगात केलेले हे लेखन सुंदर आहे. धनंजय जोग म्हणाले,ग्राहक आयोगात काम करतांना त्याविषयी मी अनभिज्ञ होतो परंतु न्यायमूर्ती राव यांनी सल्ला दिला की, देवाने सचोटी व क्षमता बघण्याची जबाबदारी तुझ्यावर सोपवली आहे, करून दाखव आणि मी कायद्याचा अभ्यास करून यशस्वी झालो. आठ महिन्यात जवळ जवळ ८५ ग्राहक हक्क निवाडे निकालात काढले.

दशरथ परब यांनी सांगितले की, ग्राहक हक्काबद्दल जागृती हवी. जोग यांच्या अनुभवसिद्ध लेखनातून ती निश्चितच होईल. अनिल सावंत यांनी स्वागत केले. डॉ. दुर्गेश माजिक यांनी सूत्रसंचालन केले. मानसी गाडगीळ यांनी आभार मानले.

**CHANGE IN NAME**

I **DATTA GONU GAONKAR** R/o Hno- 301, Matti wada Borim Ponda Goa, would like to change my name from **DATTA GUNU GAUNKAR** TO **DATTA GONU GAONKAR** Hereafter in all documents and dealing will be known by the name **DATTA GONU GAONKAR.**